# The South Asian Academic Research Chronicle

ISSN 2454-1109

A Refereed Interdisciplinary Indexed International Open Access Monthly e-Journal

Vol. 12, Issue 5, May 2025

Editor-in-Chief:
Dr. Rohidas Nitonde

Managing Editor:
Ms. Sushama Ingole

The South Asian Academic Research Chronicle ISSN 2454-1109
A Refereed Interdisciplinary Indexed International Open Access Monthly e-Journal
Vol. 12, Issue 5, May 2025

# 3. संत साहित्यातील संत चोखोबाचे सामाजिक जीवन

**प्रा.डॉ.सुभाष सखाराम ठोके**
**श्री योगानंदस्वामी कला महाविद्यालय, वसमत जि.हिंगोली**

आज मराठी संत वाङ्मयाच्या अभ्यासाकडे उपेक्षीत दृष्टीने पाहिले जाते. मध्ययुगीन मराठी साहित्य संताचे कार्य अधोरेखित झालेले आहे. संत संप्रदायातून अनेक संत उदयास आले. त्यात संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत एकनाथ, संत तुकाराम, संत चोखेमेळा इतरही अन्नेक संत त्या काळात होते. त्यांनी मराठी साहित्य समृध्द केलेला आहे.

संत साहित्यात लांकिक जीवनाऐवजी पारलौकि जीवनाचा विचार करण्याच्या भूमिकेतून साहीत्य निर्मिती मोक्ष प्राप्तीचे साधन म्हणून येते. धर्म हेच जीवन केंद्र असल्याने सर्व साधना त्याच्या भोवती फिरतात. पुराण परंपरेची भुमिका संत काव्यात आलेली आहे. मध्ययुगीन काव्याचा अभ्यास करतांना धर्म कारणाचा समग्र जीवनावर प्रभाव होता. भारतीय जीवनशैली लक्षात घेता जाती व्यवस्था व उत्पादन व्यवस्था हिच जगण्याची चौकट होती. येथे व्यक्ती स्वातंत्र्य अशक्यच होते. संत साहित्यातील साहित्यकृती एका आषेत, भौतिक कालीन साहित्य परंपरेत निर्माण झाले. संत साहित्याचे विचार येण्याचे कारण संताच्या व्यक्तीमत्वाचा आणि साहित्याचा समाजमनावर प्रभाव पडतो.

संत साहित्यात दोन स्वर होते. एक स्वर स्वतःशी संवाद साधण्याचा व दुसरा स्वेतरांशी हितगूज करण्याचा. आपल्या समाजिक काव्यातून समाजातील दंभ, ढोंग, अन्याय, समजुती यावर प्रहार केला "मी कोण" या प्रश्नाचे उत्तर शोधण्याचाही प्रयत्न संतांनी केला आहे. या संता मध्ये संत तुकाराम तसेच संत चोखामेळा हे प्रामुख्याने आपले बंडखोर विचार व्यक्त करत होते. त्याच बरोबर संत मुक्ताबाई, संत जनाबाई, संत कान्होपात्रा ई. चे साहित्य हे समाज जीवन संबंध असल्याने सामाजिक विद्रोह व्यक्त होणे स्वाभाविक होते.

ज्या काळाचे प्रतिनिधीत्व संत चोखोबा आणि इतर संत महापुरुष करीत होते. संत चोखोबाच्या काळातील समाजिक परिस्थिती पाहता ती तळातील अस्पृश्य माणसांना जगण्यालायक नव्हती, कारण समाज जीवनाची बंदिस्त केलेली चौकट, धर्म मार्तंडाकडून भोळ्या भाबड्या जनतेचे शोषण, श्रध्दा, अंधश्रध्दा, शिगेला पोचळलेला अनाचार इ. सर्वच दृष्टीने हा संक्रमणकाळ होता. मुठभरांच्या स्वार्थी वृत्तीपायी गतीने अधोगतीकडे निघालेला समाज उघड्या डोळ्यानी ते पाहत होते.

The South Asian Academic Research Chronicle ISSN 2454-1109
A Refereed Interdisciplinary Indexed International Open Access Monthly e-Journal
Vol. 12, Issue 5, May 2025

सर्वस्व हरवलेला माणूस दोन वेळेच्या भाकरीसाठी आणि स्वसन्मानासाठी कुठलेही पाऊल उचलू शकतो. मनाने अस्पृश्य महार जातीतील संत चोखोबा पाहत होते. ही अस्पृश्यता दिवसेंदिवस वाढत होती. जातीयते मुळे पुन्हा-पुन्हा कोसळून पडत होते. तेंव्हा संत नामदेवांनी आपल्या कृपा छत्राखाली घेतले आणि चोखोबा धन्य झाले. तेथूनच चोखोबाच्या अंभगाला नवी दिशा प्राप्त झाली.

अतिशय सोप्या भाषेत जीवनाचे तत्वज्ञान आपल्या अभंगातून सांगत होते.

"शुध्द चोखामेळा, करी नामाचा सोहळा
यातीहीन मी महार, पूर्वी निळाचा अवतार चोखा म्हणे विटाळ"

अशा प्रकारचा पहिला हा संघर्ष चोखोमेळा यांच्या अंभगातून्न व्यक्त होतो.

संत तुकाराम, संत चोखा महार इ. संतांन्नी शुद्राच्या उन्नतीसाठी अंभगातून लिखानातून उजागर केला. मानवी जीवनातील आर्थिक, सामाजिक आणि मानसिक दुःख भोगलेल्या साहित्यिकानी सामाजिक विषमतेवर घणाघाती प्रहार शब्द बध्द केले आहे.

"कोण तो सोवळा कोण तो ओवळा, कोणासी विटाळ कशाचा जाहला पापांचा विटाळ एकाचिये अंगा, सोवळा तो जगामाजी कोण?"

असे संत चोखेबाचे विवेचन अभंगातून व्यक्त करतात. चोखोबाचे कुटूंब दारिद्रयात जगत असतांना सुध्दा विठ्ठल भक्तीत आपले जीवन व्यतीत करतांना दिसतात.

प्रस्थापितांकडून सांशकता जेव्हा व्यक्त होते तेंव्हा संत चोखोबाचे दुःखीमन प्रत्यक्ष विठ्ठलाला प्रश्न विचारत.

"हिन याती माझी देवा, कैसी घडे तुझी सेवा"

किंवा

"आमची केली हीन याती, तुज कान कळे श्रीपती जन्म् गेला उष्टे खाता, लाज न्न तुमचे चित्ता"।।

माणसाचे जीवन जगणेच जेव्हा दुरूस्त होते. तेव्हा हा संघर्ष जनमाणसात विचार करायला लावतो. तत्कालीन सामाजिक परिस्थिती आपल्या लक्षात येते. अगतिकतेचे अनेक दुःख पचविले.

चोखा मेळाच्या अंभगात सामाजिक अन्याची तीव्रता व्यक्त केलेली आहे.

चोखामेळाच्या काव्यातून व्यक्त होणारी ही जीवनदृष्टी ही एक आत्मभान आणि समाजभान असलेल्या सुधारकाची दिसून येते. भक्तीच्या पातळीवर आपले दुःख व्यक्त करावे

The South Asian Academic Research Chronicle ISSN 2454-1109

A Refereed Interdisciplinary Indexed International Open Access Monthly e-Journal

Vol. 12, Issue 5, May 2025

ही त्याची मानसिकता पदोपदी जाणवते. शुद्र वंशात जन्माला आलो म्हणून हीन आहे. कर्मकांड, वर्णाश्रम व्यवस्था, अंधश्रध्दा याला नाकारणारा बंडखोर चोखामेळा त्यांच्या अंभागतून सतत जाणवत राहतो.

भक्ती ही एक साधना आहे. ती करतांना सारखा स्वतःच्या मनाशी दोन पातळीवर संघर्ष करावा लागला. एकीकडे मनाशी तर दुसरीकडे समाजाशी.

"विठोबाची करितो चाकरी, खावया मागतो भाकरी, अखंड चोखा महाद्वारी, कृपा दीनावरी करा की जी मायबाप"

देवासाठी त्यांनी महाद्वारात उभा राहुनच देवाची करुणा भाळली, भेटीसाठी जीव तळमळला यातिहीनतेच्या शापाला दुभगुन ही अनुभूती चोखोबांच्या अंभागत आढळते.

"धाव घाली विठू आता चालू नको मंद। शिव्या देती महारा म्हणती देव बाटविला।

या खोट्या आरोपाने निर्माण झालेली स्थिती आपल्या अंभागतून व्यक्त केली आहे. चोखोबाची वाणी म्हणजे त्याचे प्रांजळ हृदयद्रावक कथनच आहे. आत्मनुभुती मात्र प्रामाणिक व सत्य आहे. रोखठोकपणे चोखोबा कथन करतात तेव्हा त्यांची अंभगवाणी सुंदर प्रतिभांनी सजून आपल्या समोर उभी राहते.

"ऊस डोंगा परी रस नव्हे डोंगा।
काय भुललासी वरलीया रंगा..
कमान डोंगी परी तीर न्नव्हे डोंगा।
काय भुललासी वरलीया रंगा"

आपण कसेही वेडे वाकडे, असतो तरी आपल्या अंतरगांतील अनुभव मात्र शुध्द व प्रामाणिक आहे. वरच्या रंगाला महत्व देणाऱ्या प्रस्थापितांना चोखोबांनी एक मोठा प्रश्न निर्माण केला. सामाजिक जाणीव मराठी कवितेतून पहिल्यांदा प्रगट झाली ती चोखोबांच्या कवितेत.

**संदर्भ सूची:**

1) अस्मितादर्श, आनोडि- १९९१ - संपा. डॉ. गंगाधर पानतावणे.

2) महात्मा मुलो गौरव ग्रंथः महा सन, प्रकाशित

3) प्रश्नशोध , लोक वाङ्मय, केशव मेश्राम

४) दलित साहित्य, वेदना आणि विद्रोह, श्रीविद्या प्रान, पुणे. १९७०